# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ११४/२०१८ मधील नि.क्र. ५४ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG14-000546-2018)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांनी, त्यांना दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून जोरदार हरकत घेतली आहे. त्यांनी त्यांचे युक्तिवादामध्ये वादीस जास्तीत जास्त खर्च बसविण्या व अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, हक्कसोडपत्र् रदद करणेकरीता व त्रीपक्षीय करार रदद करणेकरीता, ठरावाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांना सदर दाव्याचे समन्सची बजावणी दिनांक १५/०३/२०२० रोजी झाली आहे. परंतु, सदर कालावधीमध्ये कोरोनाचे फैलावामुळे महाराष्ट्र राज्यात लॉकडाउन जाहीर करणेत आले होते. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र. १ यांना वेळेत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदर प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रतिवादी क्र. १ हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करणार असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादी क्र. १ ची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य व संयुक्तिक आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

| अर्ज मंजूर करणेत येत आहे. |
|---|

WALI NILESH MALAKAPPA — Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA Date: 2022.02.25 15:03:35 +0530

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – २५/०२/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.